# जालना जिल्ह्यातील दाळ गिरणी उद्योग: एक दृष्टीक्षेप

**प्रा. केंदळे विजय नारायणराव**
विभागप्रमुख, भूगोल विभाग
राष्ट्रमाता महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना:**

पारंपारिक पध्दतीने ग्रामीण भागात दाळ तयार करण्यासाठी जात्यांचा वापर केला जात होता. आजही काही प्रमाणात खेडेगांवात घरगुती दाळ तयार करण्यासाठी जात्यांचा वापर केला जातो. परंतु ही स्थिती हळुहळू बदलत आहे. पारंपारिक पध्दती बदलून आधुनिक यंत्राच्या सहायाने दाळ उद्योग चालविला जात आहे.

**अभ्यास क्षेत्र:**

महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील जालना जिल्हा हा सर्वसाधारणपणे महाराष्ट्राच्या मध्यभागी आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा, पूर्वेस परभणी, दक्षिणेस बीड व पश्चिमेस औरंगाबाद जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचा बहुतांशी भाग मैदानी आहे. अंबड तालुक्यात काही टेकड्या आढळून येतात. तसेच जिल्ह्यात वायव्येस अजिंठ्याची पर्वतरांग आहे. जालना जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ ७६१२ चौ.कि.मी. एवढे आहे. जिल्ह्याचे २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १९,५९,०४६ इतकी आहे. जिल्ह्यात पर्जन्याचे प्रमाण सरासरी ६५० ते ७०० मि.मी. एवढे आढळते. जिल्ह्याचे तापमान किमान १० ते १२ अंश से. व कमाल तापमान ४० ते ४२ अंश से. इतके आहे. जिल्ह्यात गोदावरी, पुर्णा, दुधना, कुंडलिका, गलाटी, खेळणा, धामना, गिरजा, जीवरेखा या नद्या आहेत. जिल्ह्यात वनांचे प्रमाण खूप कमी आहे.

जालना जिल्ह्यामध्ये शेतीसाठी लागणारे बी-बियाणे व खते निर्माण करण्याचे अनेक उद्योग आहेत. जगभरात प्रसिध्द असलेली महिको ही कंपनी मुळत: जालना शहरातील आहे. या उद्योगाचे जाळे जगभर पसरलेले आहे. याशिवाय जालना शहराच्या उत्तर व पूर्वेस खतांचे अनेक कारखाने दिसून येतात. जालना जिल्ह्यात अनेक सुतगिरण्या, दाळ उद्योग, ऑईल मिल, साखर उद्योग वेगवेगळ्या तालुक्यात आढळून येतात.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**जालना जिल्ह्यातील दाळ गिरण्यांचा अभ्यास:**

जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दाळ गिरण्यांचा तपशील तक्ता क्र. १ मध्ये देण्यात आला आहे.

तक्ता क्र. १

**जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय दाळ गिरण्याचा तपशील (१९९१ व २०११)**

| तालुका | वर्षे | संख्या | गुंतवणूक (लाखात) | उत्पादन क्षमता (क्विंटलमध्ये) | कामगार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| जालना | १९९१ | १० | ११० | ८२३७ | ११७ |
| | २०११ | १९ | १७२ | १६४८८ | २२७ |
| | % | ९०.०० | ५६.३६ | १००.१७ | ९४.०२ |
| भोकरदन | १९९१ | १ | १४ | ७४८ | १४ |
| | २०११ | ३ | ३७ | २२८३ | ३८ |
| | % | २००.०० | १६४.२९ | २०५.२१ | १७१.४३ |
| जाफ्राबाद | १९९१ | १ | १५ | ८३९ | १५ |
| | २०११ | २ | २८ | १७२६ | २८ |
| | % | १००.०० | ८६.६७ | १०५.७२ | ८६.६७ |
| बदनापुर | १९९१ | १ | १२ | ६६१ | १३ |
| | २०११ | ० | ० | ० | ० |
| | % | -- | -- | -- | -- |
| अंबड | १९९१ | १ | १३ | ८२५ | १६ |
| | २०११ | ४ | ४६ | २९६२ | ५२ |
| | % | ३००.०० | २५३.८५ | २५९.०३ | २२५.०० |
| घनसावंगी | १९९१ | ० | ० | ० | ० |
| | २०११ | २ | १८ | १५०४ | ३० |
| | % | - | - | - | - |
| परतुर | १९९१ | १ | ७ | ६३७ | १८ |
| | २०११ | १ | ९ | ९२२ | १४ |
| | % | ०.०० | २८.५७ | ४४.७४ | -२२.२२ |
| मंठा | १९९१ | ० | ० | ० | ० |
| | २०११ | १ | ८ | ७८२ | ११ |
| | % | - | - | - | - |
| एकुण | १९९१ | १५ | १२६ | ११९४७ | १६५ |
| | २०११ | ३२ | ३१८ | २६६६७ | ३५२ |
| | % | ११३.३३ | १५२.३८ | १२३.२१ | ११३.३३ |

स्त्रोत: जिल्हा उद्योग केंद्र व म.रा.औ.वि.म. जालना

जालना जिल्ह्यातील दाळ गिरण्यांचा तालुकानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

**जालना तालुका:**

जालना तालुक्यामध्ये १९९१ मध्ये १० दाळ गिरण्या होत्या त्या वाढून २०११ पर्यंत १९ पर्यंत पोहचल्या आहेत. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, १९९१ मध्ये दाळ गिरण्यातील गुंतवणूक ही ११० लाख होती ती २०११ पर्यंत १७२ लाखापर्यंत पोहचली आहे. सन १९९१ मध्ये जालना तालुक्यातील दाळ गिरण्यांची उत्पादन क्षमता ८२३७ क्विंटल इतकी होती. यामध्ये वाढ होऊन १६४८८ क्विंटलपर्यंत पोहोचली. जालना तालुक्यातील दाळ गिरण्यांत सन १९९१ मध्ये ११७ कामगार होते तर २०११ पर्यंत यातील संख्या ही २२७ पर्यंत पोहचली आहे. शेकडेवारीत द्यावयाचे झाल्यास दाळ गिरण्यांच्या संख्येत ९०%, गुंतवणुकीत ५६%, उत्पादन क्षमतेत १००% तर कामगार संख्येत ९४% ची वाढ झालेली दिसून येते.

**भोकरदन तालुका:**

भोकरदन तालुक्यामध्ये १९९१ मध्ये १ दाळ गिरणी होती त्यात वाढू होऊन २०११ पर्यंत ३ पर्यंत पोहचली आहे. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, १९९१ मध्ये दाळ गिरण्यातील गुंतवणूक ही १४ लाख होती ती २०११ पर्यंत ३७ लाखापर्यंत पोहचली आहे. सन १९९१ मध्ये जालना तालुक्यातील दाळ गिरण्यांची उत्पादन क्षमता ७४८ क्विंटल इतकी होती. यामध्ये वाढ होऊन २२८३ क्विंटलपर्यंत पोहोचली. भोकरदन तालुक्यातील दाळ गिरण्यांत सन १९९१ मध्ये १४ कामगार होते तर २०११ पर्यंत यातील संख्या ही ३८ पर्यंत पोहचली आहे. शेकडेवारीत द्यावयाचे झाल्यास दाळ गिरण्यांच्या संख्येत २००%, गुंतवणुकीत १६४%, उत्पादन क्षमतेत २०५% तर कामगार संख्येत १७१% ची वाढ झालेली दिसून येते.

**जाफ्राबाद तालुका:**

जाफ्राबाद तालुक्यामध्ये १९९१ मध्ये १ दाळ गिरणी होती त्यात वाढू होऊन २०११ पर्यंत २ पर्यंत पोहचली आहे. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, १९९१ मध्ये दाळ गिरण्यातील गुंतवणूक ही १५ लाख होती ती २०११ पर्यंत २८ लाखापर्यंत पोहचली आहे. सन १९९१ मध्ये जाफ्राबाद तालुक्यातील दाळ गिरण्यांची उत्पादन क्षमता ८३९ क्विंटल इतकी होती. यामध्ये वाढ होऊन ही उत्पादन क्षमता १७२६ क्विंटलपर्यंत पोहोचली. जाफ्राबाद तालुक्यातील दाळ गिरण्यांत सन १९९१ मध्ये १५ कामगार होते तर २०११ पर्यंत यातील संख्या ही २८ पर्यंत पोहचली आहे. शेकडेवारीत द्यावयाचे झाल्यास दाळ गिरण्यांच्या संख्येत १००%, गुंतवणुकीत ८६%, उत्पादन क्षमतेत १०५% तर कामगार संख्येत ८६% ची वाढ झालेली दिसून येते.

**बदनापुर तालुका:**

सन २००१ पूर्वी बदनापूर तालुका हा जालना तालुक्याचा भाग होता. बदनापुर तालुक्यामध्ये १९९१ मध्ये १ दाळ गिरणी होती. ही दाळ गिरणी आता बंद आहे. म्हणजेच गिरणीची संख्या, गुंतवणूक, क्षमता व कामगार संख्या या सर्व बाबतीत ऋणात्मक प्रारुप दिसून येते.

**अंबड तालुका:**

अंबड तालुक्यामध्ये १९९१ मध्ये १ दाळ गिरणी होती त्यात वाढू होऊन २०११ पर्यंत ४ पर्यंत पोहचली आहे. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, १९९१ मध्ये दाळ गिरण्यातील गुंतवणूक ही १३ लाख होती ती २०११ पर्यंत ४६ लाखापर्यंत पोहचली आहे. सन १९९१ मध्ये अंबड तालुक्यातील दाळ गिरण्यांची उत्पादन क्षमता ८२५ क्विंटल इतकी होती. यामध्ये वाढ होऊन ही उत्पादन क्षमता २९६२ क्विंटलपर्यंत पोहोचली. अंबड तालुक्यातील दाळ गिरण्यांत सन १९९१ मध्ये १६ कामगार होते तर २०११ पर्यंत यातील संख्या ही ५२ पर्यंत पोहचली आहे. शेकडेवारीत द्यावयाचे झाल्यास दाळ गिरण्यांच्या संख्येत ३००%, गुंतवणुकीत २५३%, उत्पादन क्षमतेत २५९% तर कामगार संख्येत २२५% ची वाढ झालेली दिसून येते.

**घनसावंगी तालुका:**

घनसावंगी तालुक्यामध्ये १९९१ मध्ये कोणतीही दाळ गिरणी नव्हती परंतु २०११ मध्ये या तालुक्यात २ दाळ गिरण्या आढळून आल्या आहेत. गुंतवणुकीचा विचार केला तर सन २०११ मध्ये या दाळ गिरण्याची गुंतवणुक १८ लाखापर्यंत पोहचली आहे. घनसावंगी तालुक्यातील दाळ गिरण्याची उत्पादन क्षमता ही १५०४ क्विंटल इतकी आहे तर यात ३० कामगार काम करीत आहेत.

**परतुर तालुका:**

परतुर तालुक्यामध्ये १९९१ मध्ये १ दाळ गिरणी होती त्यात वाढ न होता ती एकच कायम आहे. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, १९९१ मध्ये दाळ गिरणीतील गुंतवणूक ही ७ लाख होती ती २०११ पर्यंत ९ लाखापर्यंत पोहचली आहे. सन १९९१ मध्ये अंबड तालुक्यातील दाळ गिरणीची उत्पादन क्षमता ६३७ क्विंटल इतकी होती. यामध्ये वाढ होऊन ही उत्पादन क्षमता ९२२ क्विंटलपर्यंत पोहोचली. परतुर तालुक्यातील दाळ गिरण्यांत सन १९९१ मध्ये १८ कामगार होते तर २०११ पर्यंत यातील संख्या ही कमी होऊन ती १४ पर्यंत पोहचली आहे. शेकडेवारीत द्यावयाचे झाल्यास दाळ गिरण्यांच्या संख्येत ०%, गुंतवणुकीत २८%, उत्पादन क्षमतेत ४४% भर पडली आहे तर कामगार संख्येत २२% ची घट झालेली दिसते.

**मंठा तालुका:**

मंठा तालुक्यामध्ये १९९१ मध्ये एकही दाळ गिरणी नव्हती. सन २०११ ला ही संख्या १ अशी आहे. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, या दाळ गिरणीची गुंतवणूक ८ लाख आहे. मंठा तालुक्यातील या दाळ गिरणीची उत्पादन क्षमता ७८२ क्विंटल इतकी आहे. मंठा तालुक्यातील दाळ गिरणीत ११ कामगार काम करतात.

**जालना जिल्हा (एकुण):**

एकत्रितरित्या जालना जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यामध्ये १९९१ मध्ये १५ दाळ गिरण्या होती त्यात वाढू होऊन ही संख्या २०११ पर्यंत ३२ पर्यंत पोहचली आहे. गुंतवणुकीचा विचार केला तर असे दिसते की, १९९१ मध्ये दाळ गिरण्यातील गुंतवणूक ही १२६ लाख होती ती २०११ पर्यंत ३१८ लाखापर्यंत पोहचली आहे. सन १९९१ मध्ये जालना जिल्ह्यातील दाळ गिरण्यांची उत्पादन क्षमता ११९४७ क्विंटल इतकी होती. यामध्ये वाढ होऊन ही उत्पादन क्षमता २०११ पर्यंत २६६६७

क्विंटलपर्यंत पोहोचली. जालना जिल्ह्यातील दाळ गिरण्यांत सन १९९१ मध्ये १६५ कामगार होते तर २०११ पर्यंत यातील संख्या ही ३५२ पर्यंत पोहचली आहे. शेकडेवारीत द्यावयाचे झाल्यास दाळ गिरण्यांच्या संख्येत ११३%, गुंतवणुकीत १५२%, उत्पादन क्षमतेत १२३% तर कामगार संख्येत ११३% ची वाढ झालेली दिसून येते.

**संदर्भ :**


- घारपुरे, व्ही. टी. : लोकसंख्या भूगोल पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
- शेटे, डॉ. फुले, डॉ शहापूरकर: वस्ती भूगोल, विदयाभारती प्रकाशन, लातूर.
- फुले, सुरेश : भूरुपशास्त्र, विदया प्रकाशन, लातूर.
- नाकतोडे व लांजेवार : नकाशाशास्त्र व प्रात्यक्षिक भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
- Alexander P. C. (1963):'Industrial Estates in India, Asia Publication House, Bombay
- Chandana R.C. and Sidhu M.S. (1980): Introduction to Population Geography, Kalyan Publishers, New Delhi
- Deshmukh, R. G. (2000): Geology and Mineral Resources of Maharashtra 2000, Director of Geology and Mining, Nagpur, Trade, Commerce and Mining Department Govt. of Maharashtra.
- Gandhi M. K. (1966): Industrialize and Perish Complied by Prabhu R. K. Navjivan Publishing House, Ahmedabad
- Singh Jasbhir : (1974) An Agriculture Atlas of India. A Geographical Analysis, Vishal Publication, Kurukshetra, India, P-13.
- Srivastava S. K., Nigam R, S. Halal Banarjee (1967): Industrial Economics Published by S. Chand and Co. New Delhi